// हरि ॐ //

## श्रीमंगलचण्डिकानैमित्तिकप्रपत्ती – स्त्रियांसाठी

१) श्रीमंगलचण्डिकानैमित्तिकप्रपत्ती संक्रांतीच्या दिवशी (१४ किंवा १५ जानेवारी ह्या दिवशी) केली जाते.

२) संक्रांतीच्या दिवशी सूर्यास्तानंतर मोकळ्या जागी स्त्रियांनी एकत्र येऊन ही प्रपत्ती करावी.

३) ह्या प्रपत्ती साठी जेवढ्या स्त्रिया एकत्र येतील तेवढ चांगल.

४) ही प्रपत्ती चार भिंतींच्या आत न करता, घराबाहेर मोकळ्या जागी, उदा.समुद्रकिनारी, नदीकिनारी, चौकातल्या जागी, घराच्या बाल्कनीमध्ये, चाळीच्या कठड्याजवळ, दोन चाळींच्या मध्ये अशा प्रकारे खुल्या जागेत करणे आवश्यक आहे.

५) सोळा वर्षावरील कुठलीही स्त्री हे करु शकते आणि एक वर्ष केलं म्हणजे दर वर्षी करायलाच पाहिजे असं मुळीच नाही पण तुम्हाला जर तुमच्या कुटुंबाच भलं हवं असेल तर दरवर्षी करायलाच हवं.

### हे कसं करावे ? याचा विधी पुढील प्रमाणे

१) स्त्रियांनी स्नान करुन पूजेसाठी यावे. ( स्त्रियांना मासिक धर्म असला तरी तो याच्या आड येत नाही; त्या जिभेला आणि नाभीला उदी लावून हे करु शकतात, बाधा उत्पन्न होणार नाही. )

२)प्रथम एका चौरंगावर किंवा पाटावर मोठी परात घ्यावी.

३) त्या परातीत गहू, त्यावर कळशी किंवा कलश, त्याच्यामध्ये तांदूळ, कळशीवर ताम्हण व त्या ताम्हणात देवीची दोन पाऊलं काढावी. उजवं पाऊल कुंकवाचं, डाव पाऊल हळदीचं.

४) मग परातीत कलशाला टेकून त्रिविक्रमाचा फोटो ठेवावा.

५)एका तबकांमध्ये त्यांनी प्रपत्ती पूजा द्रव्ये घ्यावीत. प्रपत्ती पूजा द्रव्ये – शेवग्याच्या शेंगा, केळी, काकडी किंवा दूधी, श्रीफळ म्हणजे नारळ, गाजर, मुळा किंवा तोंडली, उडदाची डाळ, तिळाचं तेल, दही, हळद( हळकुंड नव्हे), आलं, गूळ, चिंच, ऊसाचे कांडे, आणि सुगंधी फुले.

६) तसेच अभिचारनाशक पुरचुंडी असावी. अभिचार म्हणजे ज्याला आपण करणी करण्यापासून दृष्ट लागण्यापर्यंत जे काही करतो ते कुकर्म. ते सगळं कुकर्म म्हणजे अभिचार. आणि पुरचुंडी कसली ? तर अभिचारनाशक.

७)ही पुरचुंडी कशाची बनविलेली असते ? तर विड्याचे पान, त्यामध्ये मीठ, मोहरी आणि कापूर हे घालून त्या पानाला दोरीने बांधायचं व ही पुरचुंडी करायची.

८) हे तबक (प्रपत्ती पूजा द्रव्याने भरलेले तबक)हातात घेऊन उभं रहावे.

९) ह्या मध्ये वयाने जी स्त्री मोठी असेल, ती स्त्री आरती करेल व बाकीच्या स्त्रीया आरती म्हणतील. आपल्या सगळ्यांना माहीत असलेली आरती – माते गायत्री, सिंहारुढ भगवती, महिषासुरमर्दिनी, क्षमस्व चण्डिके, जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ||

१०)आरती झाल्यानंतर तबक हातात घेऊन प्रत्येक स्त्रीने चण्डिकेच्या पदचिन्हस्थानास अर्थात कतराज आश्रमास फेर धरल्याप्रमाणे नऊ प्रदक्षिणा करायच्या आणि प्रदक्षिणा करत असताना श्रीगुरुक्षेत्र मन्त्र मोठ्याने म्हणायचा.

११) प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर त्या पुरचुंडीने त्रिविक्रमाची दृष्ट काढायची आणि त्याला सांगायचं कि बाबा रे ! माझ्या घरावर असणारी कुदृष्टी, कुबुध्दी ह्या सगळ्यांचा तू तुझ्या आईच्या सहाय्याने नाश कर.

१२) मग ती पुरचुंडी परातीत किंवा होमकुंडात किंवा खड्यात, कापूर आणि काड्यांच्या सहाय्याने जो अग्नि निर्माण केला असेल, त्यामध्ये ही पुरचुंडी अर्पण करायची.

१३) हा निर्माण केलेला अग्नि म्हणजे महिषासुरमर्दिनीचे तेजोवलयम्.

१४) या कृतीने तुम्ही काय करता ? त्या त्रिविक्रमावर जबाबदारी टाकता – तू माझ्या घराला लागणारी सर्व बाधा दूर कर.

१५) इथे श्री गुरुक्षेत्रम् मन्त्रामुळे त्या अग्निचे रुपांतरण तेजोवलयम् मध्ये झालेलं असेल. तुमच्या घरावर असलेली कुदृष्टी, कुबुध्दी, कुकर्म ह्या तेजोवलयम् मध्ये गेल्यामुळे तुमच्या घराचं कल्याणच होईल.

१६) पूजा समाप्त झाल्यानंतर ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे हा मंत्र नऊ वेळा म्हणत सर्व स्त्रियांनी त्या पावलावर अक्षता वाहाव्यात व त्रिविक्रमास सुगंधी फुले अर्पण करावीत व तेजोवलयम्च्या अग्निस कडुनिंबाच्या पाल्याने शांत करावे.

१७)नंतर सर्व जमलेल्या स्त्रियांनी त्या पावलांतील हळद- कुंकू घरी न नेता स्वत:च्या कपाळाला किंवा कपाळाला लावायला ज्यांना भीती वाटत असेल त्यांनी गळ्याला तिथल्या तिथेच लावून घ्यावे.

१८) प्रपत्ती पूजा द्रव्यातील केळी देवीसमोर ठेवून त्याचा एकत्रित प्रसाद करुन सर्व स्त्रियांनी घरी न नेता तिथेच खावा. (कृपया डझनभर केळी आणू नयेत.)

१९)दही मात्र घरी नेऊन घरातील पुरुषांना प्रसाद म्हणून द्यावे. हे दही स्त्रियांनी खाऊ नये. जर काही कारणास्तव घरात पुरुषमंडळी नसतील तर ते दही कुठल्याही वृक्षाच्या मुळाशी अर्पण करावे.

२०)नंतर ऊस स्त्रियांनी घरी नेऊन स्वत: खावा व घरातील इतर स्त्रियांनाही द्यावा. तो त्या दिवशी थोडा तरी खावा, मात्र तो त्याच दिवशी खाऊन संपविला पाहिजे असेही नाही.

२१)बाकीच्या उरलेल्या प्रपत्ती पूजा द्रव्यांचे (केळी, दही, ऊस आणि सुगंधी फुले सोडून) सांबार बनवून ते त्याच रात्री घरातील स्त्रिया व पुरुषांनी पोळी आणि भाताबरोबर खावे.

२२) सांबार तयार करण्यासाठी त्यात मसाल्याचा वापर करण्यास हरकत नाही. तसेच चवीसाठी व आरोग्यासाठी कडीपत्ता जरुर घालावा. मात्र ह्या दिवशी इतर कुठलीही भाजी करु नये. पोळी आणि भात खायाचं या सांबाऱ्याबरोबर

**हे सर्व व्रत म्हणजे श्रीमंगलचण्डिकानैमित्तिकप्रपत्ती, स्त्रियांसाठी. हे करणाऱ्या स्त्रिया आदिमाता चण्डिकेच्या सैनिक बनतात. स्वत:च्या गृहरक्षणासाठी, स्वत:च्या आप्तांच्या रक्षणासाठी. तसेच ती स्त्री प्रत्येकाची बॉडीगार्ड बनते. मग ती आई असो, बहीण असो, पत्नी असो कोणत्याही भूमिकेत असो ती तिच्या संपूर्ण घराची रक्षणकर्ती बनते.**

**श्रीमंगलचण्डिकानैमित्तिकप्रपत्ती करणारी स्त्री अबला नसेल. ती अबला राहणार नाही, ती दुर्बल राहणार नाही. ती स्वत:च्या घराचं रक्षण करण्यासाठी समर्थ बनेल. मात्र एकच, नित्य श्रीगुरुक्षेत्र मन्त्राचे पठण आणि संक्रांतीच्या दिवशी हे व्रत मनापासून करणे.**

सदगुरु श्री अनिरुध्द बापू
रामराज्य (पान. नं. ४३ - ४७)